दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ४३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१४ मे २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# उरणच्या ६७२ मेगावॅट वीजनिर्मिती क्षमतेचा प्रकल्प गॅसवर

## अपुऱ्या गॅस पुरवठ्यामुळे सहापैकी चार संच बंद

**दै.रायगड नगरी । उरण**

ऐन उन्हाळ्यात वाढत्या पाऱ्यामुळे नागरिकांची घामाने भिजून काहिली होत असताना मात्र वीजेच्या टंचाईचे चटके सामान्यांना सोसावे लागत आ–हेत. उरणच्या बोकडविरा ग्रामपंचायतींच्या हद्दीत असलेल्या महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या विद्युत केंद्राला (जीटीपीएस) गेल्या अनेक वर्षांपासून पुरेशा प्रमाणात गॅस पुरवठाच होत नाही. त्यामुळे प्रकल्पातील सहापैकी विद्युत निर्मिती चार संच बंदच ठेवावा लागत असल्याने ६७२ मेगावॅट वीजनिर्मितीच्या प्रकल्पाची क्षमता निम्म्याहून अधिक घटली आहे.या घटलेल्या वीज निर्मितीमुळे राज्यातील वीज तुटवड्यात आणखीनच भर पडली आहे.



जर्मन तंत्रज्ञानाच्या आधारावर १९८५ साली उरणचा वायु विद्युत प्रकल्प उभारण्यात आला आहे. सहा संचातुन ६७२ मेगावॅट वीजनिर्मितीसाठी ३.५ दशलक्ष क्युबीक मीटर गॅसची आवश्यकता आहे.मात्र सुरुवातीपासूनच केवळ २.६ ते २.८ क्युबिक मीटर या सरासरीनुसारच गॅसचा पुरवठा होत होता. त्यानंतर मागील काही वर्षांपासून वीजनिर्मितीच्या दोन संचासाठी २.५ दररोज क्युबीक मीटर गॅसची आवश्यकता आहे.मात्र फक्त सरासरी २.०५ क्युबीक मीटर गॅसचा पुरवठा गेल कंपनीकडून होत आहे. मागील काही वर्षांपासून आवश्यकतेनुसार गॅस पुरवठा होत नसल्याने सहापैकी चार संच बंद पडले आहेत. त्यामुळे ६७२ मेगावॅट वीजनिर्मिती प्रकल्पातुन आता दररोज २५० ते ३०० मेगावॅट इतकीच वीजनिर्मिती होत आहे.

वीजनिर्मितीचे संच सातत्याने बंद ठेवले जात असल्याने कोट्यावधी रुपये खर्च करून उभारण्यात आलेले संच भंगारात जाऊन नादुरुस्त होण्याच्या मार्गावर आहेत.या वीज निर्मिती केंद्राचे विस्तारीकरण करण्याची योजनाही आखण्यात आली होती.या विस्तारीकरणाच्या योजनेमुळे ६७२ मेगावॅट वीजनिर्मिती प्रकल्पाची क्षमता वाढून १२२० मेगावॅटपर्यंत पोहचणार होती.मात्र १२२० वीजनिर्मितीच्या या प्रकल्पाच्या विस्ताराचा प्रश्नही गॅसच्या कमतरतेमुळे प्रलंबीत राहिला आहे.

वीजनिर्मिती प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालविण्यासाठी शंभर टक्के गॅस पुरवठा झाल्यास सध्याची प्रकल्पाची क्षमतेप्रमाणे ६०० मेगावॅटची वीज निर्मिती करणे फारसे अवघड नाही. मात्र गॅसचा किती प्रमाणात पुरवठा करावा याबाबतचे धोरण केंद्र सरकार आणि ओएनजीसी व गेल या कंपन्यांच्या माध्यमातून ठरत असल्याने त्यांनी ठरवून दिल्याप्रमाणेच प्रकल्पाला सध्या गॅस पुरवठा केला जात आहे. त्यामुळे अपुर्या गॅस पुरवठयामुळेच वीजनिर्मिती कमी प्रमाणात होत असल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

गेल कंपनीकडून आवश्यकतेनुसार जीटीपीएसला याआधीही कधीही गॅस पुरवठा झालेला नाही.त्यामुळे ६७२ मेगावॅट वीजनिर्मितीचे सहापैकी चार संच याआधीच बंद पडले आहेत.उर्वरित सुरू असलेल्या वीज निर्मितीच्या दोन संचासाठी आवश्यक असणाऱ्या २.५ ऐवजी फक्त १.०५ इतकाच गॅस पुरवठा होत आहे.त्यामुळे वीजनिर्मिती केंद्राची क्षमता २५०–३०० मेगावॅट पर्यंत घसरली आहे. त्यामुळे १२२० वीजनिर्मितीच्या या प्रकल्पाच्या विस्ताराचा प्रश्नही गॅसच्या कमतरतेमुळे प्रलंबीत राहिला असल्याची माहिती जीटीपीएसचे पीआरओ महेश आफळे यांनी दिलीआहे.

# एस.टी. बस ला लागली अचानक आग ; प्रवासी सुखरूप

**दै.रायगड नगरी । पनवेल**



भरधाव वेगाने पनवेल बाजूकडून पेण बाजूकडे जाणाऱ्या एस टी बस ला आज सकाळी अचानक पणे कर्नाळा अभयारण्य येथे लागलेल्या आगीत एस टी चे मोठे नुकसान झाले असले तरी सुदैवाने बस मधील प्रवासी बचावले आहेत.

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीत शुक्रवारी सकाळी ०९:१५ चा सुमारास मुंबई– गोवा महामार्गावर एस टी महामंडळाची बस नं. MH-14 BT- 2056 ही. कर्नाळा अभयारण्य येथे आले वेळी अचानक शॉर्ट सर्किटमुळे आग लागण्याची घटना आहे.सदर बस मध्ये ५२ प्रवासी प्रवास करीत होते आग फायर ब्रिगेडने पूर्णपणे विझवली आहे. सदर घटनेमध्ये कोणीही प्रवासी जखमी झाले नसून या रस्तावरीर वाहतूक सुरळीतपणे चालू आहे. सदर बस ही मुंबई कडून महाड कडे चालली होती.

# भावनेच्या आधारावर चालणाऱ्या पक्षात दीर्घकाळ घालवल्यामुळे गावचा विकास खुंटला : खा. सुनील तटकरे

## निगडी काठी, बागमांडला रामवाडी येथील कार्यकर्त्यांचा शिवसेनेतून राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश



**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

भावनेच्या आधारावर चालणाऱ्या पक्षावर वर्षानुवर्षे विसंबून राहिलेल्यामुळे गावचा विकास खुंटला आहे. मतदार संघात वीस पंचवीस वर्षांपासून रखडलेला विकास जणू काही आकाशच फाटलं होत. मात्र थोडी थोडी ठिगळे लावत विकास करत असताना. परिवर्तनाची राजकीय लाट येत आसल्याच वक्तव्य खा. सुनील तटकरे यांनी केलं.

निगडी काठी सामाजिक सभागृह भूमिपूजन, कैलेवाडी मोहिते वाडी रस्त्याचे उदघाटन, गडबवाडी विठ्ठल रुक्मिणी मंदिर जीर्णोद्धार पक्षप्रवेश आदी कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर तालुकाध्यक्ष दर्शन विचारे, उपतालुकाध्यक्ष अमित खोत, समन्वय समिती सदस्य हिदायत कुदृते, राजश्री मुरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना ३ जून रोजी झालेल्या निसर्गचक्रीवादळात मोठ्याप्रणात नुकसान झालं होतं त्यावेळी भारत सरकारने मदत देण्याची योग्य भूमिका घेतली नाही. मात्र महाविकास आघाडी सरकारने ७० कोटी रुपयांचा भरीव अशी मदत निधी उपलब्ध करून दिली. बॅ अंतुले साहेबांनी पाहिलेलं रेवस रेड्डी महामार्ग स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीने काम करत असताना. कोकणाला झुकत माप देणाऱ्या उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी १० हजर कोटी रुपयांचा मंजुरी करून दिला.

.../२

## संक्षिप्त...

### नवाब मलिकांना कोर्टाचा दिलासा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांखाली तुरुंगात अस–लेले महाविकास आघाडीचे मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांना विशेष पीएमएलए न्यायालयाकडून अंशतः दिलासा मिळाला आहे. नवाब मलिक यांनी वैद्यकीय कारणासाठी जामिनाची मागणी केली होती. मात्र, पीएमएलए न्यायालयाने नवाब मलिक यांना जामीन दिला नसला तरी त्यांना खासगी रुग्णालयात उपचार घेण्याची परवानगी दिली आहे. गेल्या काही दिवसांमध्ये तुरुंगात असल्यामुळे नवाब मलिक यांची प्रकृती प्रचंड खालावली आहे. त्यामुळे हा निर्णय मलिक यांच्यासाठी दिलासा मानला जात आहे. नवाब मलिक यांच्यावर कुर्ला येथील क्रिटी केअर रुग्णालयात उपचार होणार आहेत. उपचारांबरोबरच पोलिस बंदोबस्तासाठी येणारा खर्च मलिक कुटुंबाला उचलावा लागणार आहे. मलिक यांच्यासोबत एकाच कुटुंब सदस्याला राहण्याची मुभा न्यायालयाने दिली आहे. सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) नवाब मलिक यांना २३ फेब्रुवारी रोजी अटक केली होती. सुरुवातीला ते पोलीस कोठडीत होते. त्यानंतर त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली. तेव्हाप–ासून नवाब मलिक यांच्या शारीरिक व्याधी उफाळून आल्या आहेत. काही दिवसांपूर्वी नवाब मलिक यांची प्रकृती खूपच खालावल्याने त्यांना स्ट्रेचरवरून जे.जे. रुग्णालयात दाखल करण्याची वेळ आली होती. त्यांना काही काळ अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर नवाब मलिक यांनी जामिनाची मागणी केली होती. मला मूत्रपिंडाचा आजार असून त्यामुळे पायांना सूज येत आहे. त्याशिवाय अनेक आजार आहेत. मूत्रपिंडाच्या आजारावर खासगी रुग्णालयात शस्त्रक्रियेद्वारे कायमस्वरूपी उपचार करण्याची इच्छा असल्याने सहा आठवड्यांपुरता जामीन मंजूर करण्यात यावा, अशी मागणी नवाब मलिक यांन केली होती.

# आगरदांडा ते नांदले रस्त्याची दुरावस्था : सार्वजनिक बांधकाम खात्याला निवेदन

## तातडीने रस्ता दुरुस्त न झाल्यास आगरदांडा अदानी पोर्ट गेटसमोर आंदोलन करण्याचा इशारा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**



पावसाळा ऐन तोंडावर आ–लेला असताना मुरुड तालुक्यातील आगरदांडा गावातून जाणारा रस्ता ते नांदले गावाकडे जाणा–या रस्त्याची खाच खळगे व खड्ड्यांमुळे आजही पार दुरावस्था असून याबाबत कुणबी समाजोन्नती संघातर्फे पंचक्रोशी समाज अध्यक्ष संतोष पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत सार्वजनिक बांधकाम खात्याचे उप अभियंता यांना एक निवेदन देण्यात येऊन रस्त्याची सात दिवसांत दुरुस्ती न झाल्यास ग्रामस्थांच्यावतीने आगरदांडा अदानी पोर्ट गेटसमोर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, आगरदांडा गावातून जाणारा ते नांदले गावाला जाणारा मुख्य रस्त्या बाबत दि.१७ फेब्रुवारी रोजी आपणास निवेदन देण्यात आले होते.सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम अर्थसंकल्पामध्ये मंजूर असून कामाचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यता करिता विभागीय कार्यालयाकडे सादर केले आहे.कार्यालयीन कामे पूर्ण झाल्यानंतर आगरदांडा गाव ते नांदले गावाकडे जाणारा रस्ता दुरुस्ती करता येईल. असे आपल्या कार्यालयाकडून दि.२५ जानेवारी २०२२ रोजी आम्हाला कळविण्यात आले होते.त्यानंतर सदर रस्त्याच्या कामाबाबत आपल्या कार्यालयाकडे सातत्याने पाठपुरावा करत असताना देखील सदर काम पावसाळ्यापूर्वी होणे गरजेचे असताना सदर काम कधी होईल.याबाबतची माहिती आपल्या कार्यालयाकडून मिळत नसल्यामुळे आमच्या परीसरा–तील कुणबी समाज

.../२

# दक्षिण आशियाई फेडरेशन गेम्स टेबल टेनिस आणि राष्ट्रीय स्पर्धेत स्वस्तिका घोषची सुवर्ण कामगिरी; लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले अभिनंदन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मानाच्या दक्षिण आशियाई फेडरेशन गेम्स टेबल टेनिस स्पर्धेत सीकेटी महाविद्यालयाची विद्यार्थिनी व टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोष हिने सांघिक सुर्वण पदक तर राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत रजत पदक पटकावित पुन्हा एकदा दैदिप्यमान कामगिरी केली असून त्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तिचा आज (दि. १३) सत्कार केला.

यावेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, स्वस्तिकाचे वडील व प्रशिक्षक संदीप घोष आदी उपस्थित होते.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलमध्ये स्वस्तिकाने इयत्ता तिसरी ते बारावी पर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर आता ती खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात (स्वायत्त) बीएमएसचे प्रथम वर्षाचे शिक्षण घेत आहे. स्वस्तिकाने देशात व परदेशात झालेल्या टेबलटेनिस स्पर्धेत चमकदारी कामगिरी करीत देशाचे नाव उंचाविले आहे. स्वस्तिकाने लहानपणापासून टेबलटेनिस खेळात आपली आवड व नैपुण्य दाखविले आहे. मालदीव येथे दिनांक ९ ते ११ मे दरम्यान १९ वर्षांखालील दक्षिण आशियाई फेडरेशन चॅम्पियन स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत भारत, पाकिस्तान, नेपाळ, मालदीव, भूतान, बांगलादेश आणि श्रीलंका आदी देशातील संघाचा सहभाग होता. या स्पर्धेत सांघिक गटात स्वस्तिका घोष हिच्यावर भारतीय संघाची कर्णधार म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली होती. यावेळी सर्वोत्कृष्ट कामगिरी करत भारतीय संघाने सांघिक सुवर्णपदक पटकाविले. तसेच शिलाँग येथे झालेल्या ८३ व्या राष्ट्रीय टेबल टेनिस

.../२



# विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी १८ मे पासून पुकारणार बेमुदत उपोषण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदेचे सरपंच यांच्या अकार्यक्षमतेमुळे व ग्रुप ग्रामपंचायत तुराडे आणि वावेघर यांच्याकडून थकीत पाणी बिल न भरल्यामुळे गुळसुंदे हद्दीतील हजारो नागरिकांना पाताळगंगेचे दूषित पाणी प्यावे लागत आहे. स्थानिक ग्रामस्थ व ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेच्या वतीने अनेक वेळा पत्रव्यवहार मोर्चे आंदोलने व उपोषणे करून संबंधितांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. ज्यामुळे जल जीवन मिशन योजनेतून १ कोटी १९ लाख रुपयांचा निधी मंजूर होऊन मार्च २०२२ मध्ये सदर कामाचे कार्यादेश झाले आहेत. परंतु गुळसुंदे ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष करून नागरिकांच्या आरोग्याशी खेळत आहेत. त्यामुळे विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी १८ मे पासून बेमुदत उपोषण पुकारणार असल्याचा ईशारा ग्रामसवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकुर यांच्यातर्फे देण्यात आला आहे.

.../२

# पनवेलमधील रस्त्यांच्या दुरूस्ती बाबत खा.बारणेंची आयुक्तांकडे पत्राद्वारे मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पनवेल मधील बऱ्याच रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या निदर्शनास स्थानिक नागरिकांनी व शिवसैनिकांनी आणल्याने खासदार श्रीरंग बारणे यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांना ते रस्ते दुरुस्ती व नवीन रस्ते करण्या संदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याचे पत्र दिले आहे.

शहरातील पटेल मोहल्ला येथील ईदगाह मुस्लीम कब्रस्थान येथील रस्ता खूपच खराब झाला असून पावसाळ्यात तो पूर्ण पणे चिखलात जातो, त्यामुळे अंत्यसंस्कार करणेस खूप त्रासदायक होते, त्याचप्रमाणे

.../२



# शिल्लक ऊसाचा फास

पावसाळा तोंडावर असतानाही शेतातला उभा ऊस आणि डोक्यावर कर्ज या विवंचनेतून बीड जिल्ह्यातील नामदेव जाधव या शेतकऱ्याने शिल्लक उसाचा फड पेटवून देऊन मरणाला कवटाळल्याची घटना सुन्न करणारी आहे. काही दिवसांपूर्वीच परभणीत एका शेतकऱ्याने याच प्रश्नावरून आत्मदहनाचा प्रयत्न केला होता. यातून शिल्लक उसाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रासह अन्य राज्यांमध्ये वैफल्यग्रस्त शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची दुर्दैवी मालिका सुरू आहे. त्यामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रमाण कमी होते. शेतीच्या प्रश्नांकडे वेळीच लक्ष देऊन गांभीर्याने उपाययोजना केल्या नाहीत, तर काय घडू शकते, याची भयप्रद चाहूल या घटनांतून लागते. फक्त मराठवाडाच नव्हे, तर संपूर्ण राज्यातील शिल्लक उसाचा प्रश्न गंभीर बनल्याचे हे निदर्शक. दुष्काळ, अतिवृष्टी-गारपीट, चुकीची धोरणे अशा अस्मानी आणि सुलतानी संकटांची मालिका शेतकऱ्यांसाठी कायम आहे. 'शेतकऱ्यांनी बाजारपेठांचा अंदाज घेऊन पिके घ्यावीत,' असे कथित पंडित सांगतात; परंतु आजही शेतकऱ्यांना हमखास उत्पन्न मिळवून देणारे ऊस हेच नगदी पीक आहे. उसाची लागण त्यामुळेच वाढत आहे, या वास्तवाकडे पाठ फिरविता येणार नाही. गेल्या पावसाळ्यात मराठवाड्यासह अन्यत्र झालेला चांगला पाऊस आणि भरलेल्या धरणांमुळे उसाचे क्षेत्र वाढले; त्यामुळे यंदा साडेतेरा लाख हेक्टर क्षेत्रावर शंभर वर्षांतील विक्रमी ऊस उत्पादन झाले. राज्यातील सुमारे दोनशे कारखान्यांमधून आतापर्यंत १३२ लाख टन साखरेचे उत्पादन झाले असून, आणखी पाच लाख टन उत्पादन होईल, असा अंदाज आहे. गेल्या अनेक वर्षांच्या तुलनेत हे प्रमाण किती तरी अधिक आहे; मात्र मे महिना निम्मा सरला, तरी सगळ्या उसाचे गाळप न झाल्याने, ऊस शेतात उभा असलेल्या शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. राज्यात सध्या ९६, म्हणजे गेल्या वर्षीच्या तुलनेत जवळपास दुप्पट कारखाने अजूनही सुरू असून, संपूर्ण उभ्या उसाचे गाळप होईपर्यंत कारखाने सुरू ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत; परंतु गाळपास उशीर झाल्याने उसाचे वजन आणि उताऱ्यातही घट होते. यांपैकी काही कारखाने मे महिन्याच्या अखेरपर्यंत, तर काही कारखाने जूनच्या प्रारंभीही सुरू राहतील. मराठवाड्यात आजमितीला ४२ हजार हेक्टरवर ऊस उभा असल्याचे सरकारी आकडेवारी सांगते. न नोंदविलेल्या उसाचे प्रमाण पाहता शिल्लक ऊस त्यापेक्षा अधिक असावा. अशात पावसाला सुरुवात झाली, तर ऊस तोडणीअभावी राहण्याची शक्यता आहे. डोक्यावर कर्ज असलेल्या शेतकऱ्यांची अस्वस्थता यामुळे आणखी वाढली आहे. गेल्या काही काळात यंत्रांच्या वापराने तोडणीला वेग आला असला, तरी उसाचे प्रमाणच प्रचंड आहे. त्यातच उन्हामुळे तोडणीचा वेगही मंदावतो आहे. अशा वेळी शिल्लक ऊस नेण्याच्या दबावातून कारखाना वाहतूकदार आणि तोडणी करणाऱ्या साखळीतूनही शेतकऱ्यांची पिळवणूक होते. मग कोणाचा ऊस आधी न्यायचा, याबाबतही स्थानिक पातळीवर डावे-उजवे होते. ही अस्वस्थता आणि नैराश्यातून टोकाचे पाऊल उचलल्याने आत्महत्यांसारखे दुर्दैवी प्रकार घडत आहेत. पाऊसमान, धरणांची स्थिती आणि वर्ष-सव्वा वर्षापूर्वी लावलेल्या उसाच्या विक्रमी उत्पादनाचा अंदाज गेल्या वर्षीच आला होता. त्यानंतर त्याच्या गाळपाचे प्रयत्न झाले; पण ते अपुरे पडल्याचे आता लक्षात आले आहे. परिस्थितीचा अंदाज असतानाही सरकारने अतिरिक्त उसाच्या गाळपाचे नियोजन केले नाही, असा विरोधकांचा आरोप असून, ठिकठिकाणी आंदोलनेही सुरू आहेत; तसेच राज्यातील काही कारखान्यांनी कार्यक्षेत्रात ऊस उभा असतानाही हंगाम संपविल्याचा आरोप आहे. या सर्व आरोपांची शहानिशा झाली पाहिजे. उसाचे विक्रमी उत्पादन असताना कायमस्वरूपी बंद कारखानेही योग्य व्यवस्थापनाकडे सोपविण्याचा विचार व्हायला हवा होता. आता उभ्या राहिलेल्या या परिस्थितीत राज्य सरकारने वाहतूक अनुदान आणि घटलेल्या उताऱ्यापोटी भरपाई अशा काही उपाययोजना केल्या आहेत. शिल्लक उसालाही अनुदान देण्याचे योजण्यात आले आहे; मात्र या उपायांना मर्यादा आहेत. सुदैवाने विक्रमी उत्पादनानंतरही साखरेसह इथेनॉलसारख्या उपपदार्थांचा दर स्थिर असून, स्थानिक बाजारपेठेसह निर्यातीलाही चांगली मागणी असल्याने एक चिंता कमी झाली आहे. अर्थात, हे उपाय नंतरचे आहेत. राज्यात अजूनही गाळपाविना उभ्या असलेल्या ४० लाख टन उसाचे पावसाळ्यापूर्वीच गाळप कसे होईल, हे आव्हान आहे. त्यासाठी काटेकोर नियोजन करण्यास प्राधान्य दिले पाहिजे. निरर्थक विषयांवरून परस्परांच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्यात दंग असलेल्या सर्वपक्षीय नेत्यांनी अशा मूलभूत प्रश्नांवर आवाज उठवून नियोजनातही सहकार्य केले पाहिजे. असे झाले, तरच महाराष्ट्रातील उत्पादनाच्या विक्रमाचा आनंद मानता येईल; अन्यथा बळीराजाच्या वेदनांच्या अंधारयात्रेला अंत राहणार नाही.

# उदयोन्मुख चित्रकार कुणाल साळवीचे मुंबईत चित्रप्रदर्शन





**दै.रायगड नगरी । कर्जत**

मूळ कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील पण शिक्षणासाठी कर्जतच्या दहिवली मध्ये स्थायिक असलेल्या उदयोन्मुख चित्रकार कुणाल विजय साळवी याचे चित्रप्रदर्शन मुंबईतील जहांगीर आर्ट गॅलरी मध्ये सुरू असून ते १६ मे पर्यँत पहाण्यासाठी खुले आहे.

कुणालचे लहानपण कोकणातल्या निसर्गरम्य वातावरणात गेलं. सुंदर समुद्रकिनारे, हिरवीगार वनराई, पक्ष्यांचे किलबिलाट, मच्छिमार आणि त्यांच्या विविधरंगी बोटी, वेगवेगळी माणसे आणि त्यांच्या वेशभूषा, समुद्राच्या पोटात गुडूप होणार सूर्यास्त आणि त्यानंतरची भरलेली संध्याकाळ अश्या अनेक गोष्टी अनुभवत त्याच बालपण समृद्ध होत गेलं. सोबत होते कोकणातले अनेक सणवार व त्या अनुषंगाने येणाऱ्या विविध गोष्टी ज्यात देखावे, सजावट, आरत्या, मिरवणूक, पालखी इत्यादी गोष्टींचे नकळत मनावर संस्कार घडत गेले. शालेय शिक्षणासाठी कोकणातून मुंबईत आल्यावर शाळेत चित्रकलेच्या तासाला तो विविध चित्रे काढू लागला. मनाच्या कॅनव्हासवर लहानपणी उमटलेले विविध रंग होतेच. ते अपोपाप कागदावर उतरत गेले. आणि साकार होत गेली काही चित्रे ज्यांच्यामुळे शिक्षकांना त्याच्यातील वेगळेपण जाणवले. आणि त्यांच प्रोत्साहन आणि वेळोवेळी मार्गदर्शन त्याला मिळत गेले. आणि त्याने मनाशी निर्णय दृढ केला तो चित्रकार बनण्याचा.

आर्ट कॉलेजमध्ये शिकत असताना मुंबईतल्या विविध रस्त्यांनी, गल्ली बोळांनी फिरत असताना अनेक जागांनी तो भारावून जात असे. ती प्रत्येक ठिकाणे त्याला नवीन होती. मला खुणावत होती. तो त्यांच्याकडे आकर्षित होत गेला. कोकणातल्या देखाव्यांनंतर त्याच्या मनावर राज्य केलं ते ह्या मुंबईतील वेगवेगळ्या जागांनी. कोकणातील समृद्ध जीवन दाखवताना सोबतच ही मुंबईतील चित्रे तो साकारत होती. या प्रक्रियेत त्याचा नेहमी हाच प्रयत्न असे की चित्र हे मनाला भावणारे असावे. जशी त्याची चित्रे त्याच्याशी संवाद साधतात तशी त्यांचा तुमच्याशी देखील संवाद साधला गेला पाहिजे असा त्याचा नेहमी प्रयत्न असतो. त्याच्या चित्रांची भुरळ परदेशी चित्र रसिकांना सुद्धा आहे. त्याच्या चित्रांचे प्रदर्शन मुंबईतील जहांगीर आर्ट गॅलरी मध्ये सुरू असून ते १६ मे पर्यंत असणार आहे.

# सेवानिवृत्त मुंबई पोलीस कर्मचाऱ्याचा शेतकरी म्हणून यशस्वी प्रयत्न

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

रायगड जिल्ह्यातील पोलादपूर शहरालगत असलेल्या सडवली येथील सेवानिवृत्त पोलिस शेतकऱ्यांने आंबा पिकाचे भरघोस उत्पादन घेतले.

सडवली येथील नामदेव कृष्णा जाधव हे मुंबई पोलीस मध्ये नोकरी करत असताना त्यांनी पोलादपूर तालुका कृषी अधिकारी पोलादपूर कार्यालयाच्या सहकार्याने मौजे सडवली गावामध्ये आंबा या पिकाची लागवड केली होती. परंतु अपुऱ्या मशागतीमुळे त्यांना दरवर्षी अपेक्षेप्रमाणे उत्पादन मिळाले नाही. मे २०२१ पासून तालुका कृषी अधिकारी पोल-ादपूर कार्यालयातील कृषी सहाय्यक अनिल वलेकर यांच्या मार्गदर्शनाने जाधव यांनी खत व्यवस्थापन करण्याचे ठरवले. जून २०२१ मध्ये नवनियुक्त कृषी पर्यवेक्षक भरत कदम यांच्या मार्गदर्शनाने जून २०२१ मध्ये बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली यांच्या शिफारशीप्रमाणे खत व्यवस्थापन करण्यात आले तसेच ऑगस्ट २०२१ मध्ये शिफारशीप्रमाणे कल्टारचा उपयोग करण्यात आला. या खत व्यवस्थापनाने जाधव यांच्या बागेला नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये चांगला मोहोर आला. सदर बागेला विद्यापीठाच्या वेळापत्रकाप्रमाणे फवारणीदेखील करण्यात आली व जाधव या शेतकऱ्यांनी एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आंबा फळाची काढणी चालू केली व सदर फळाची विक्री मुंबई व पोलादपूर परिसरामध्ये चांगल्याप्रकारे चालू आहे. जाधव यांच्या सहकार्याने गावातील इतर शेतकऱ्यानी देखील या वर्षी कल्टारचा वापर करून आपल्या बागेतून चांगले उत्पादन घेतले.

पोलादपूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक यांच्याकडून तालुक्यातील शेतकऱ्यांनी मार्गदर्शन घेऊन आपल्या बागेतून भरघोस उत्पादन घ्यावे, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी एन.वाय.घरत यांनी केले आहे.

# छत्रपती शिवरायांच्या अश्वारुढ पुतळ्याचे अनावरण

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर तालुका ग्रामीण भागातील गोळेगणी येथे आ. भरत गोगावले यांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. यावेळी आ.गोगावले यांनी, भारतीयांनी विशेषत: महाड पोलादपूर तालुक्यातील जनतेने छ.शिवाजी महाराजांचा आदर्श घेण्याचे आवाहन यावेळी केले.

पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी सारख्या अतिदुर्गम भागात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभा करणे ही सोपी गोष्ट नसून छत्रपती शिवरायांवर असलेल्या आपल्या निष्ठेमुळे आणि छत्रपतींचे विचार आपल्या मना-मनात रुजल्यामुळे असे पुतळा उभारण्याचे कार्य घडू शकले, असे मत व्यक्त करून आ.गोगावले यांनी गोळे-गणी ग्रामस्थांचे अगदी मनापासून कौतुक करत आभार मानले. आता आपण नुसते स्मारक आणि पुतळे उभारून चालणार नाही तर छ.शिवाजी महाराज यांचे विचार देखील आचरणात आणणे गरजेचे आहे, असे आवाहन यावेळी केले.

या कार्यक्रमासाठी तालुका संपर्कप्रमुख किशोर जाधव, माजी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे तसेच तालुक्यातील आणि मुंबई-पुणे येथून आलेले चाकरमानी, तालुक्यातील शिवसेना युवा सेनेचे आजी माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

नगरविकास व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री श्री.एकनाथ शिंदे हे शनिवार, दि.१४ मे २०२२ रोजी रायगड जिल्ह्यातील रेवदंडा येथे दौऱ्यावर असून त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे:

सकाळी १०.०० वाजता रिलायन्स कंपनीचे हेलिपॅड कोपरखैरणे येथे आगमन व तेथून खाजगी हेलिकॉप्टरने रेवदंडा, जि.रायगड कडे प्रयाण. सकाळी १०:४५ वाजता जेएसडब्ल्यू कंपनीचे हेलिपॅड येथे आगमन व येथून मोटारीने रेवदंडा जि.रायगड कडे प्रयाण. सकाळी ११.१५ वाजता रेवदंडा येथील स्थानिक कार्यक्रमास उपस्थिती व राखीव. दुपारी ०२.०० वाजता रेवदंडा येथून मोटारीने जेएसडब्ल्यू कंपनीच्या हेलिपॅडकडे प्रयाण. दुपारी २:३० जेएसडब्ल्यू कंपनीचे हेलिपॅड, साळाव येथून खाजगी हेलिकॉप्टरने मुंबईकडे प्रयाण.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## भावनेच्या आधारावर चालणाऱ्या पक्षात दीर्घकाळ घालवल्यामुळे गावचा विकास खुंटला

रेवस ते रेड्डी महामार्ग झाल्यानंतर येत्या चार पाच वर्षात तालुक्याच्या विकासाला चालना मिळेल असे मत यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केले. निगडी काठी येथे संबोधतात निगडी काठीवर जाण्याचा रस्ता २२ वर्ष रस्ता तसाच राहिला आहे. येत्या वर्षात नवीन रस्त्याच्या कामाला चालना दिली जाईल व पुढील काळात तुम्हाला निवेदन देण्याची गरज भासणार नाही अशी काम गावात होतील असे आश्वासन खा. सुनील तटकरे यांनी याप्रसंगी दिले.

## आगरदांडा ते नांदले रस्त्याची दुरावस्था : सार्वजनिक बांधकाम खात्याला निवेदन

बांधवांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

आगरदांडा गावातून जाणारा रस्ता संपूर्णपणे नादुरुस्त झाला असून सदर रस्त्यावरून दोन चाकी, चारचाकी सह अन्य वाहनांना त्रास सहन करावा लागत आहे.रस्त्याच्या दुरावस्थेमुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे.यामुळे आजही अपघातामुळे जिवित व वित्त हानीची शक्यता नाकारता येत नाही.सदर रस्त्याचे काम सात दिवसांत न झाल्यास याविरोधात नांदले ते मिठागर परीसरातील सर्व ग्रामस्थांच्यावतीने दि.२० मे २०२२ रोजी आगरदांडा अदानी पोर्ट गेटसमोर रास्ता रोको आंदोलन छेडावे लागेल.मग याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहील.असे कुणबी समाजोन्नती संघातर्फे देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले असून सदर निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी-रायगड, पोलिस अधीक्षक, मुरुड तहसीलदार, पोलिस निरीक्षक यांना देण्यात आल्या आहेत.यावेळी कुणबी समाजोन्नती संघातर्फे पंचक्रोशी कुणबी समाज अध्यक्ष संतोष पाटील उपाध्यक्ष रामा आरकर,सचिव सचिन पाटील, हरिश्चंद्र शिवणे, सुरेश पाटील, कृष्णा माळी आदी. उपस्थित होते.

## विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी १८ मे पासून पुकारणार बेमुदत उपोषण

गुळसुंदे ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांना पिण्यासाठी पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचे नमुने रायगड जिल्हा शासकीय प्रयोगशाळेत तपासल्यानंतर आलेल्या पाणी अहवालाचे अवलोकन करून दोषी सरपंच आणि ग्रामसेवकांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, गुळसुंदे ग्रामपंचायतीसाठी जलजीवन मिशनमधील निधी मंजूर होऊन कार्यादेश झालेल्या योजनेचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे, जोपर्यंत ग्रामपंचायत तुराडे व वावेघर हे एम.आय.डी.सीचे थकीत पाणी बिल भरत नाहीत तोपर्यंत त्यांचा पाणी पुरवठा खंडित करण्यात यावा व लाडीवली गाव, लोना कॉलनी आणि लाडीवली आदिवासी वाडी ही स्वतंत्र ग्रामपंचायत कारण्याबाबतची कारवाई तात्काळ करण्यात यावी ह्या मागण्यांसाठी १८ मे पासून उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पनवेल यांच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसणार आहेत.

## पनवेलमधील रस्त्यांच्या दुरुस्ती बाबत खा.बारणेंची आयुक्तांकडे पत्राद्वारे मागणी

धाकटा खांदा गाव येथील तळ्याकाठचा रस्ता देखील पावसाळ्यात तलाव पूर्ण भरून वाहू लागतो त्यामुळे नागरिकांना ये-जा करण्यास खूप अडचण होते परिणामी अपघात देखील होऊ शकतात त्यामुळे तलावाला सुरक्षा भिंत व रस्ता दुरुस्त होणे आवश्यक आहे. सदर रस्ते दुरुस्त करणे बाबत आयुक्त गणेश देशमुख यांना खासदार बारणे यांनी पत्र देऊन योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.सदरच्या रस्त्यांबाबत खासदारांना पत्र देताना पनवेल शहरप्रमुख प्रविण जाधव, नवीन पनवेल शहरप्रमुख यतीन देशमुख, मा.नगरसेवक विश्वास म्हात्रे, गजफर नावडेकर, शाखाप्रमुख भास्कर पाटील, मुकुंद पाटील आदी उपस्थित होते.

## स्वस्तिका घोषची सुवर्ण कामगिरी; लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले अभिनंदन

चॅम्पियनशिप स्पर्धेत रजत पटकाविले. त्याचबरोबर युकेमध्ये जुलै महिन्यात कॉमनवेल्थ गेम्स स्पर्धा होणार असून देशात चौथ्या क्रमांकावर असलेल्या स्वस्तिका घोषची २५ ते ३० मे पर्यंत होणाऱ्या टॉप ८ कॅम्प साठी निवड झाली आहे.

# ग्रामपंचायत आकुर्ली

**ता.पनवेल, जि.रायगड**

जा.क्र.३५/ग्रा.पं./आस्था २०२२
ग्रामपंचायत आकुर्ली
दिनांक : १२/०५/२०२२

प्रति,

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलाचे ग्रामपंचायत आकुर्ली कर आकारणी नोंद वहितील नावात बदल करण्याबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**(वाचा : मुंबई ग्रामपंचायत अधिनियम ८ नियम ३२ (१))**

| अ.क्र. | भाग क्र. | स.नं./प्रॉ.नं./फा.प्लॉट/ सदनिका/गाळा नं. | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | | बालाजी सिम्फनी आकुर्ली ४०७/A/१३०१ | बालाजी सिम्फनी तर्फे प्रो.प्रा.विनय श्रवणकुमार अग्रवाल | डॉ.निलजकुमार देशमुख रुपाली देशमुख |
| २ | | बालाजी सिम्फनी आकुर्ली ४०७/A/१९०२ | बालाजी सिम्फनी तर्फे प्रो.प्रा.विनय श्रवणकुमार अग्रवाल | नरसिंम्हन श्रीनिवासन शारदाम्बळ वेंकटेश्वरन तायमकुलजय |
| ३ | | बालाजी सिम्फनी आकुर्ली ४०७/A/२३०१ | बालाजी सिम्फनी तर्फे प्रो.प्रा.विनय श्रवणकुमार अग्रवाल | जिुन वर्गीस के, जिन्सी जीनू वर्गीस के.ओ.वर्गीस |
| ४ | | बालाजी सिम्फनी आकुर्ली ४०७/F/१८०१ | बालाजी सिम्फनी तर्फे प्रो.प्रा.विनय श्रवणकुमार अग्रवाल | सोमतपा दत्ता हिरक दत्ता |
| ५ | | बालाजी सिम्फनी आकुर्ली ४०७/F/२६०५ | बालाजी सिम्फनी तर्फे प्रो.प्रा.विनय श्रवणकुमार अग्रवाल | योगेश दत्तात्रय केंजळे योगिता योगेश केंजळे दत्तात्रय रामकृष्ण केंजळे प्रभावती दत्तात्रय केंजळे |
| ६ | | बालाजी सिम्फनी आकुर्ली ४०७/F/२८०५ | बालाजी सिम्फनी तर्फे प्रो.प्रा.विनय श्रवणकुमार अग्रवाल | शीला प्रसाद नायर निखील प्रसाद नायर |
| ७ | | बालाजी सिम्फनी आकुर्ली ४०७/F/१७०५ | बालाजी सिम्फनी तर्फे प्रो.प्रा.विनय श्रवणकुमार अग्रवाल | अर्चना जितेंद्र शहा राधा जितेंद्र शहा |
| ८ | | बालाजी सिम्फनी आकुर्ली ४०७/G/१८०४ | बालाजी सिम्फनी तर्फे प्रो.प्रा.विनय श्रवणकुमार अग्रवाल | दिनेश श्रीपति पाल बिंदु पाल |
| ९ | | बालाजी सिम्फनी आकुर्ली ४०७/G/२६०५ | बालाजी सिम्फनी तर्फे प्रो.प्रा.विनय श्रवणकुमार अग्रवाल | शुभम राजेंद्र झांजुर्णे राजेंद्र श्रीरंग झांजुर्णे उषा राजेंद्र झांजुर्णे |
| १० | | बालाजी सिम्फनी आकुर्ली ४०७/H/१४०१ | बालाजी सिम्फनी तर्फे प्रो.प्रा.विनय श्रवणकुमार अग्रवाल | प्रकाश रामदास गमरे प्राची प्रकाश गमरे |
| ११ | | बालाजी सिम्फनी आकुर्ली ४०७/A/२६०१ | संतोष कुमार शेट्टी निशा संतोष शेट्टी | माथ्यु विटूवात्तीकाल थोमस अनिता माथ्यु |
| १२ | | आशिर्वाद रेसिडेन्सी आकुर्ली ४०३/००२ | मे.आशिर्वाद डेव्हलपर्स तर्फे भागीदार विकास प्रकाश करोशे | चंद्रकांत श्रीपत सुतार वैशाली चंद्रकांत सुतार |
| १३ | | अपेक्षा कॉम्लेक्स आकुर्ली २०७ ब/I/२०६ | हर्षवर्धन गोपीचंद चोगले | मनोज प्रकाश नांदगावकर मानसी मनोज नांदगावकर |
| १४ | | आशिर्वाद रेसिडेन्सी आकुर्ली ४०३/१०६ | मे.आशिर्वाद डेव्हलपर्स तर्फे भागीदार हरिश्चंद्र गणपत नाथरे | स्वप्नील अशोक कांबळे स्वरांजली स्वप्नील कांबळे |
| १५ | | आशिर्वाद रेसिडेन्सी आकुर्ली ४०३/२०४ | मे.आशिर्वाद डेव्हलपर्स तर्फे भागीदार अनिकेत दिलीप माने | ऋषिकेश जनार्दन बिरवाडकर दिपाली ऋषिकेश बिरवाडकर |
| १६ | | अपेक्षा कॉम्लेक्स आकुर्ली २०७ ब/H/००२ | विजय मोहनराव माने | जयंत सदाशिव प्रभु प्रतिभा जयंत प्रभु |
| १७ | | मातेश्वरी कॉम्प्लेक्स आकुर्ली ३०८ /H/२०१ | संजीवनी मनोहर विचारे | किशोर भाऊराव विचारे |
| १८ | | युनियन पार्क आकुर्ली ३२३ /A/२०२ | इंद्रजित यशवंत मेंदाडकर | गायत्री दिपक पवार दिपक जनार्दन पवार |
| १९ | | पनवेल पॅराडाईज आकुर्ली ३६० /N/२०२ | निखील प्रकाश घोलप उज्वला पी. घोलप | विनोद जयवंत साळुंखे निशा विनोद साळुंखे |
| २० | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८ /C3/२०२ | मातेश्वरी हौसिंग एलएलपी तर्फे भागीदार परेश बाबुलाल पटेल | मंजुला कान्तीलाल वैष्णव |
| २१ | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८ /C3/२०२ | मंजुला कान्तीलाल वैष्णव | सागर मदनलाल तापडीया |

वरील बाबत प्रकरण परत्वे आवश्यकतेनुसार ग्रामपंचायत आकुर्ली कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्याच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीचे प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसाचे आत ग्रामपंचायत आकुर्ली कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरील प्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरण मुंबई ग्रामपंचायत अधिनियम प्रकरण ८ नियम ३२ (१) नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**सौ.भारती सचिन पाटील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत आकुर्ली**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**श्री.जयेंद्र घनश्याम म्हात्रे**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत आकुर्ली**
**ता.पनवेल, जि.रायगड**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## भिसे ग्रुपग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी रा.कॉं.च्या स्वाती करंजे यांची निवड

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहा तालुक्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाणार्या मेढे विभागातील भिसे ग्रुपग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी संजय गांधी निराधार योजनेचे विद्यमान सदस्य रघूनाथ करंजे (गुरुजी) यांच्या स्नुषा स्वाती प्रविण करंजे यांची निवड झाली आहे. ग्रामपंचायत कार्यालयात उपसरपंच पदासाठी सरपंच सुप्रिया ठमके यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मावळते उपसरपंच तानाजी जाधव यांनी आपला कार्यकाळ पूर्ण झाल्यामुळे आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदासाठी हि निवडणूक घेण्यात आली. उपसरपंच पदासाठी स्वाती प्रविण करंजे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची उपसरपंचपदी निवड करण्यात आली. सदर झालेल्या निवडणूक प्रक्रियेमध्ये सरपंच सुप्रिया ठमके, मावळते उपसरपंच तानाजी जाधव, प्रशांत करंजे, अनामिका ठमके, वेदिका मते, नयना करंजे, ग्रामसेविका रोशनी निळेकर यांनी उपस्थिती दर्शविली. उपसरपंच स्वाती करंजे यांची निवड विधानपरिषद आ.अनिकेत तटकरे यांच्या आदेशानुसार सर्व सदस्यांनी एकमतानी केली. यावेळी पार पडलेल्या उपसरपंचपदाच्या निवडप्रक्रियेसाठी रोहा तालुका युवक कार्याध्यक्ष मयुर खैरे, सरपंच सुप्रिया ठमके, चंद्रकांत बा. ठमके, तानाजी जाधव, हेमंत करंजे, हरिश्चंद्र ठमके, भगवान करंजे, विलास ठमके, प्रविण करंजे, मोतीराम ठमके, भगवान गोवर्धने, दिनेश घरट, शरद गोवर्धने, मदन जाधव, सचिन करंजे, राजेवाडी ग्रामस्थ व महिला वर्ग मोठया संख्येने उपस्थित होते.

## रेल्वेच्या धक्यात अनोळखी इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल कडून पेणच्या दिशेने जाणारे आष्टी लॉजिस्टिक समोर रेल्वे रुळावर एका ४० ते ४५ वर्षीय इसमाचा मृतदेह सापडून आलेला आहे. या ईसमाच्या नातेवाइकांचा शोध पनवेल तालुका पोलीस करत आहेत. पनवेल ते पेण रेल्वे रूळावर ७४/३४ किलोमीटर येथे ट्रेनचा जोराचा धक्का लागल्याने ४० ते ४५ वर्षीय इसमचा मृत्यू झाला. या ईसमाच्या हाताच्या मनगटावर आतल्या बाजूने दिल गोंदलेला आहे. तसेच छातीवर डाव्या बाजूस इंग्रजीत एकनाथ व मा आणि छातीवर उजव्या बाजूस इंग्रजीत मुरारी व मा असे गोंदलेले दिसत आहे. त्याच्या अंगात निळ्या रंगाचा फाटलेला शर्ट आहे. या ईसमाबाबत अधिक माहिती असल्यास सहाय्यक पोलीस निरीक्षक धनश्री पवार यांच्याशी संपर्क साधावा.

## प्रतिक सुर्वे भाजयुमो पोलादपूर तालुकाध्यक्षपदी

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

भारतीय जनता युवा मोर्चाच्या पोलादपूर तालुका अध्यक्षपदी प्रतिक नंदकुमार सुर्वे यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी नियुक्ती पत्र देऊन पुष्पगुच्छ देताना युवा मोर्चा रायगड जिल्हा अध्यक्ष अमित घाग,सरचिटणीस शिवाजीराव पाटील, सरचिटणीस तसेच तळा नगरपंचायतीचे नगरसेवक रितेश मुंडे, सरचिटणीस जयदीप तांबूतकर, चिटणीस महेश निकम, विश्वजीत भोसले, ऋषभ जैन उपस्थित होते. पोलादपूर नगरपंचायतीच्या निवडणुकीमध्ये पहिल्या टप्प्यामध्ये पत्नीची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून उमेदवारी लढविणाऱ्या प्रतिक सुर्वे यांनी दुसऱ्या टप्प्यामध्ये भारतीय जनता पक्षातर्फे उमेदवारी अर्ज स्वत: दाखल करून खळबळ उडवून दिली होती.


दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com


### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल १) मे.ठाकूर रियल्टर्स प्रा.लि.तर्फे डायरेक्टर श्री.मत्यगयेंद्र एस सिंग ऑफिस पत्ता : ऑफिस क्र.६०५, ६०६, सहावा मजला, शगुन इनसिगनया, भूखंड क्र.१८५, सेक्टर-१९, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड ह्यांना खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेला सिडकोकडून २२.५ टक्के योजनेप्रमाणे खालील भूखंड त्रिपक्षीय करारनाम्याने हस्तांतरीत करावयाचे आहेत त्यांचे मुळ मालक १) भिमाबाई जन्नाधन घरत, २) श्री.विजय जन्नाधन घरत, ३) श्री.नितीन जन्नाधन घरत, ४) श्री.राजेंद्र जन्नाधन घरत रा.वरचे ओवळे, पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड. ५) हिराबाई पद्माकर पाटील, रा.रोडपाली, नावडे, ता.पनवेल, जि.रायगड ह्यांचेकडून २२.५ टक्के योजनेप्रमाणे खालील भूखंड वाटप झालेला आहे. आमचे अशिल यांनी सदरहू भूखंड त्रिपक्षीय करारान्वये ५० टक्के हस्तांतरीत करण्याचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पुष्पक नगर, ता.पनवेल, जि.रायगड**

| फाईल क्र. | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र चौरस मि. |
|---|---|---|---|
| OWA-१२५ | ८ | ६६ | २२०१.११ |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणाचाही दान, गहाण, तारण, लिन, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरील नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसांत जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून विकसनाचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,

दिनांक : १२/०५/२०२२

सही/-
अशिलातर्फे वकील
सुनिता राम पाटील
Advocate & Notary Public
(M.Com, M.A., L.L.M, G.D.C. & A)
Shop No.26, Sec-1 A, Prabhat Center
CBD-Belapur, Navi Mumbai-400614
9867688788 (SMS whatsapp only)

# अखेरच्या सिझनमध्ये एकदरा येथील मच्छीमारांना कोलंबीचा छोटा जॅकपॉट

**दै.रायगड नगरी । मुरुड**



समुद्रात मोठ्या मासळीच्या दुष्काळामुळे मुरूड तालुक्यातील ७० टक्के मोठ्या नौका १ जून पूर्वीच किनाऱ्यावर लॉकडाऊन करण्यात आलेल्या आहेत. मात्र ३० टक्के एकदरा, येथील छोट्या नौका काहीतरी मासळी मिळेल या अपेक्षेने किनाऱ्या जवळ उथळ समुद्रात जात असतात. अखेरच्या सिझन मध्ये त्यांची ही अपेक्षा सफल झाली असे गेल्या ४ दिवसांत दिसून येत आहे.

एकदरा, परिसरातील नौकांना मुरूड समोरील समुद्रात पदमजलदुर्ग परिसरात मोठया प्रमाणात कोलंबी मासळी मिळू लागल्याने मासळी दुष्काळात आर्थिक आशेचा मोठा किरण गवसल्याचे दिसूम येत आहे. एकदरा महादेव कोळी समाज अध्यक्ष पांडुरंग आगरकर, मुरूड महादेव कोळी समाज अध्यक्ष आणि रायगड मच्चीमार कृती समितीचे अध्यक्ष मनोहर बैले, यांनी शुक्रवारी बोलताना सांगितले की, मासळीच्या दुष्काळाने होरपळलेल्या छोट्या मच्छीमारांना कोलंबी मोठया प्रमाणात मिळू लागल्याने एक प्रकारे अचानक जॅकपॉट आहे असे मत व्यक्त केले.

गेल्या ४ ते ५ दिवसांपासून एकदरा येथील ३० ते ४० छोट्या २ सिलेंडर्स वाल्या नौका दिवसात २ ते ३ वेळा कोलंबीच्या मासेमारीस जाताना दिसून येत आहेत. कोलंबी, मांदेली अशी छोटी मासळी मिळत असल्याने कोलंबीचे सोडे काढण्यासाठी कोळी भगिनींची मोठी लगबग सुरू असल्याचे एकदरा येथील मच्छीमार रोहन निशानदार, यांनी सांगितले. अशी मासेमारी दिवसा- रात्री दोन वेळा केली जाते असे सांगून रोहन निशानदार म्हणाले की, सध्या कोलंबी मोठया प्रमाणात मिळत असल्याने कातळावर सुकविलेल्या सोड्याचा भाव रुपये १७००/- (सतराशे) असून हे भाव आवाक्यात येण्याचे दिसत आहेत. ओल्या कोलंबीचा साधारण १ किलो टोपली चा प्रतवारी प्रमाणे भाव २००/- ते ३००/- असून टायनी, चैती अशा प्रकारातील ही लाल कोलंबी आहे. पावसाळा येत असल्याने नागरिक आणि पर्यटकांतुन कोलंबी सोडयांना मोठी मागणी दिसत आहे. त्यामुळे कोलंबीची आवक वाढणे ही एकदरा येथील मच्छीमारांसाठी पावसाळी उदरनिर्वाहासाठी आशेचा किरण ठरू शकतो. वादळी पावसाची शक्यता असल्याने हे छोटे मच्छीमार कोलंबीची जलद आणि जास्तीत जास्त मासेमारी करण्यात प्रयत्नशील असल्याचे दिसून येत आहे.

रावस, सुरमई, घोळ, कुपा, पापलेट, पाला अशी मासळी समुद्रात मिळेनाशी झाल्याने ६ सिलेंडर्स वाल्या मोठया नौका मे, महिन्याच्या सुरुवातीला किनाऱ्यावर ओढण्यात आल्याने मार्केट मध्ये ही बाहेरगावांतून येणारी मोठी मासळी ३० टक्के प्रमाणात दिसून येत असून भाव देखील परवडणारे नाहीत. त्यामुळे पर्यटकांचा, नागरिकांचा हिरमोड दिसून येतोय. गेल्या ३ ते ४ वर्षांत मासळीच्या दुष्काळाचे हे संकट या वर्षी आधिक गडद झाल्याने मच्छीमार मोठया प्रमाणात होरपळला आहे. अशा कठीण परिस्थितीमध्ये शासनाने मच्चीमारांच्या पाठीमागे ठामपणे उभे राहणे ही काळाची गरज आहे, अशी मागणी रायगड मच्चीमार कृती संघाचे अध्यक्ष मनोहर बैले, मुरूड तालुका कृती समिती अध्यक्ष पांडुरंग आगरकर, राज्य मच्चीमार संघाचे संचालक विजय गिदी, यांनी बोलताना केली आहे. सध्या मुरूड तालुक्यात पाऊस सदृश ढगाळ वातावरण आहे.

मुरूड पासून ४ किमी वर असणाऱ्या राजपुरी येथील समुद्रकिनारी कोलिम म्हणजे जवळा येत असून मुरूडच्या मार्केट मध्ये विक्रीस येत आहे. ५०/- रुपयाला दोन वाटे प्रमाणे याची विक्री राजपुरी येथील महिला करताना दिसून येतात. सुकी मासळी खरेदीसाठी देखील पर्यटक आणि स्थानिक नागरिकांचा कल दिसत आहे. राजपूरी येथिल जवळा खूप चविष्ट असल्याने मागणी वाढती आहे. फ्राय जवळा रेसिपी ही ग्रामीण भागात लोकप्रिय असून आता पुणे, मुंबई तील पर्यटकांच्या पसंतीस हळूहळू उतरू लागली आहे.

# संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीची सभा संपन्न

**दै.रायगड नगरी । कर्जत**



कर्जत तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीची यंदाची पहिली सभा संपन्न झाली. या सभेत ३२ लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले. हे सर्व अर्ज ग्रामीण भागातील होते. तालुक्यातील जास्तीत जास्त लाभार्थींना लाभ मिळावा. यासाठी सर्व सदस्यांनी प्रयत्न करावा असे सूचित करण्यात आले.

कर्जतच्या तहसीलदारांच्या दालनात संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी यंदाची ही पहिलीच सभा असल्याने नवनिर्वाचित अध्यक्ष व सदस्यांचा तहसीलदार विक्रम देशमुख यांनी सत्कार केला. मनोहर थोरवे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा सुरू झाली. भाई गायकर, शिवराम बदे, विजय मांडे, ऋषीकेश भगत, अमर साळोखे, कांता पादिर, पूजा सुर्वे, गट विकास अधिकारी छत्रसिंग रजपूत, नगरपरिषदेचे जितेंद्र गोसावी, नायब तहसीलदार विजय चव्हाण, अव्वल कारकून गोवर्धन माने आदी उपस्थित होते. तहसीलदार देशमुख यांनी सदस्यांना या योजनेबद्दलची माहिती सांगितली. त्यानंतर मागील प्रस्तावित अर्ज सभेपुढे ठेवण्यात आले. हे सर्व अर्जामध्ये आवश्यक कागदपत्रे असल्याने सर्वच्या सर्व ३२ अर्जाना मंजुरी देण्यात आली.

यावेळी अमर साळोखे यांनी, 'लाभार्थींना लाभ मिळावा यासाठी कर्जत नगरपरिषदे कडून सहकार्य मिळत नसल्याने लाभार्थी लाभापासून वंचित रहात आहेत. यापुढे नगरपरिषदेने सहकार्य करावे.' अशी अपेक्षा व्यक्त केली. 'तालुक्यातील जास्तीत जास्त व्यक्तींना या योजनेच्या वतीने लाभ मिळावा म्हणून सर्व सदस्यांनी प्रयत्न करावेत.' अशी अपेक्षा अध्यक्ष मनोहर थोरवे यांनी व्यक्त केली.

२०२२ मार्च अखेर पर्यंत संजय गांधी निराधार योजना अंतर्गत सर्वसाधारण १०४६ व्यक्तींना, अनुसूचित जातीच्या २५५ व्यक्तींना, अनुसूचित जमातीच्या २५१ व्यक्तींना, श्रावण बाळ सेवा निवृत्ती वेतन योजनेंतर्गत १७१ सर्वसाधारण व्यक्तींना, ३८ अनुसूचित जातींच्या व्यक्तींना, ३७ अनुसूचित जमातीच्या व्यक्तींना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजनेंतर्गत ७७७ व्यक्तींना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजनेंतर्गत १८९ व्यक्तींना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजनेंतर्गत २९ व्यक्तींना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय कुटुंब लाभ निवृत्ती वेतन योजनेंतर्गत ४१ व्यक्तींना अशा एकूण २८३४ व्यक्तींना दरमहा लाभ मिळत असल्याची माहिती तहसीलदार विक्रम देशमुख यांनी दिली.

### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : शिवकर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकत / जमीन ही आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : शिवकर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गांव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| शिवकर | दिलीप रामा ढवळे<br>पार्वतीबाई रामा ढवळे<br>त्रिंबक रामा ढवळे<br>यांचे मालकीचे क्षेत्र | ६५ | ०-५८-२०<br>पोटखराबा ०-०४-५०<br>एकूण क्षेत्र ०-६२-७० | १३.१२ |
| | | | ०-३४-२०<br>पोटखराबा ०-०४-५०<br>एकूण क्षेत्र ०-३८-७० | ७.७१ |
| | | पैकी खरेदी क्षेत्र | ०-२२-०० | |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रर, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल

दिनांक : १३/०५/२०२२

सही/-
ॲड.महेश भगत
पत्ता : शॉप नं.२२, कल्पतरु कॉम्प्लेक्स,
प्लॉट नं.५१, सेक्टर नं.९, खांदा कॉलनी,
नवीन पनवेल-पश्चिम, ता.पनवेल, जि.रायगड
मोबा नं.८६५२०३४७०३

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते आहे की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत ही जमीन मालक / भोगवटादार श्री.बबन गोविंद नाईक, रा.मु.पाबळ, ता.पेण, जि.रायगड, श्री.सुधीर जानू पदरत, रा.मु.पाबळ, ता.पेण, जि.रायगड आणि श्रीमती.हर्षदा हरिभाऊ आयरे, रा.मु.पाबळ, ता.पेण, जि.रायगड यांच्याकडून आमचे अशिल हे कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पाबळ, ता.पेण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४२ | ०० | ००-५१-४०<br>पो.ख. ००-०३-५०<br>एकूण ००-५४-९०<br>पैकी ००-३६-०० | ८.७२ |
| ३७ | अ | ००-५९-७०<br>पो.ख. ००-००-००<br>एकूण ००-५९-७०<br>पैकी ००-१६-०० | ६.५० |
| ४३ | ०० | ००-२८-६०<br>पो.ख. ००-०४-६०<br>एकूण ००-३३-२० | ४.०० |

वर नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा, कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, दिवाणी दावा, महसूलवाद असल्यास, त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे हरकत मुदतीत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल नमूद केलेले मालक / भोगवटादाराबरोबर ठरलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : उरण

दिनांक : १३/०५/२०२२

सही/-
ॲड.रुपेश गणेश पाटील
शॉप नं.१, झहीर अपार्टमेंट,
सिटीजन हायस्कूल समोर, ता.उरण
मो.नं.९८२१७३५७४८
मो.नं.८४२४८१७५५७

# माणगाव तालुक्यातील मंडळ अधिकारी व तलाठी सजा निजामपूर कार्यालयाकरिता शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

तलाठी कार्यालय हे नागरिकांसाठी ग्रामीण स्तरावरील अत्यंत महत्त्वाचे कार्यालय मानले जाते. या कार्यालयातून जनतेची महसूलविषयक सर्व प्रकारची महत्त्वाची कामे केली जातात.

ग्रामीण भागातील जनतेची महसूलविषयक कामे सुलभ व्हावीत, प्रशासन गतिमान व्हावे तसेच येथील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या व या कार्यालयात विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांच्या दृष्टीने या मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालयाची इमारत सुसज्ज व अद्ययावत असणे, ही काळाची गरज होती, या दृष्टीने पालकमंत्री या नात्याने कु.आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष देण्यास सुरुवात केली.

या पार्श्वभूमीवर माणगाव तालुक्यातील मंडळ अधिकारी निजामपूर व तलाठी सजा निजामपूर या कार्यालयांच्या इमारतींच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी केली होती. याबाबत पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार मंडळ अधिकारी निजामपूर व तलाठी सजा निजामपूर साठी मौजे निजामपूर ता.माणगाव येथील स.नं.१०८/ब,०-११-२० हे.आर.क्षेत्र ही शासकीय जमीन महसूल मुक्त व सारामाफीने तहसिलदार माणगाव यांच्याकडे मंडळ अधिकारी निजामपूर व तलाठी सजा निजामपूर कार्यालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी जारी केले आहेत. यामुळे खऱ्या अर्थाने महसूल प्रशासन गतिमान होऊन जनतेला महसूल विषयक सोयी सुविधा सुलभतेने मिळतील. विविध प्रशासकीय कार्यालयांच्या नव्या इमारतीसाठी व अद्ययावतीकरणासाठी पालकमंत्री कु. आदिती तटकरे करीत असलेल्या पाठपुराव्यामुळे प्रशासन निश्चितच गतिमान होण्यास मोठा हातभार लागणार आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकत ही खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसूल दप्तरी नावे असून ती त्यांचे खुद्द, ताबा, कब्जा मालकी, वहिवाटीतील आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मौजे : वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड. तलाठी सजा : वावंजे हद्दीतील**

| मालकाचे नाव | गट/ भूमापन क्रं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे | भोगवटदार वर्ग-१ |
|---|---|---|---|---|
| शकील इब्राहीम पटेल<br>उमरमिया अब्दुल लतीफ पटेल<br>ईस्माईल इस्लाम खान | ६५/३/ब | ०-२९-२०<br>एकूण ०-२९-२० | १.७५ | |
| एकूण ०-२९-२० या सामाईक क्षेत्रापैकी ०-१२-०० एवढे क्षेत्र | | | | |

वरील मिळकतीसंबंधत आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला असून वरील मिळकतींवर अन्य कोणाचा, दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन, चार्ज, ॲटेचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहिवाट, ताबा, कब्जा वहिवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉरगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रेक्वीझिशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध तसेच एकत्र कुटुंब मिळकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

हे कळावे,

दिनांक : १४/०५/२०२२

ठिकाण : कळंबोली

सही/-
ॲड.सुनील एन. मोरे
ऑफिस नं.३०६०, सी-विंग, बिमा कॉम्प्लेक्स
प्रिमायसेस, प्लॉट नं.११९, सेक्टर-के डब्ल्यू सी
कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१८
मो.नं.८३६९४६५७९९/९९२०४५५७२७

मा.राव साहेब कोर्ट

ॲड.शशिकांत काळु म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.६०३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०७/२०२२

१) सुनिता रवींद्र पाटील
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
२) विकी रवींद्र पाटील
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
३) धन्यता रवींद्र पाटील
वय : २४ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.पडघे, ता.पनवेल, जि.रायगड
४) अंकिता रवींद्र पाटील
लग्नानंतरचे नाव अंकिता प्रवीण मुंबईकर
वय : २८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.पडघे, ता.पनवेल, जि.रायगड
५) रुक्मिणी गंगाराम पाटील उर्फ भोईर
वय : ७० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.पडघे, ता.पनवेल, जि.रायगड ... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही ... सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील व अर्जदार क्र.५ यांचा मुलगा कै.रवींद्र गंगाराम पाटील हे दि.४/०५/२०२१ रोजी अष्टविनायक हॉस्पिटल पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.रवींद्र गंगाराम पाटील यांच्या नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| १ | श्री गणेश, सदनिका क्र.२०१, प्लॉट क्र.३२, से.१७, दुसरा मजला, तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड | १६.३१ चौ.मी.कारपेट, २.८१ बाल्कनी, १९.१२ चौ.मी. |
| २ | श्री गणेश, सदनिका क्र.२०२, प्लॉट नं.३२ से.१७, दुसरा मजला, तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड | १६.४० चौ.मी.कारपेट, २.८१ बाल्कनी, १९.१२ चौ.मी. |
| ३ | श्री गणेश सदनिका क्र.३०२, प्लॉट नं.३२, से.१७, तिसरा मजला, तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड | १६.४० चौ.मी.कारपेट, २.८१ बाल्कनी, १९.१२ चौ.मी. |

कै.रवींद्र गंगाराम पाटील यांचे वर नमूद मिळकतीस अर्जदार हेच वारसदार आहेत असा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या.वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतीस कै.रवींद्र गंगाराम पाटील यांचे अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.१३/५/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## आदिती तटकरे रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्यमंत्री, उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क, विधी व न्याय तथा पालकमंत्री रायगड कु.आदिती तटकरे यांचा शनिवार, दि.१४ मे २०२२ व रविवार, दि.१५ मे २०२२ रोजीचा रायगड जिल्हा दौरा पुढीलप्रमाणे-शनिवार, दि.१४ मे २०२२: सकाळी ०८.३० वाजता अलिबाग येथून मोटारीने रेवदंडा, ता.अलिबाग कडे प्रयाण. सकाळी ०९.०० वाजता रेवदंडा येथे आगमन व पद्मभूषण डॉ.आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्त सदिच्छा भेट. सकाळी ०९.३० वाजता रेवदंडा येथून मोटारीने श्रीवर्धनकडे प्रयाण. दुपारी १२.०० वाजता श्रीवर्धन येथे आगमन व श्रीवर्धन तालुक्यातील विविध विकास कामांचे भूमीपूजन. दांडगुरी येथे रस्ता उद्घाटन, साखरोने येथे रस्ता उद्घाटन, मोहितेवाडी येथे स्मशानशेड उद्घाटन, वाळवटी येथे अंतर्गत रस्ता उद्घाटन. रात्री श्रीवर्धन येथे मुक्काम.रविवार, दि.१५ मे २०२२: सकाळी ०९.३० वाजता श्रीवर्धन बीच बांधकाम कामाची पाहणी. सकाळी १०.०० वाजता श्रीवर्धन शहर विविध विकास कामे- १.श्रीवर्धन नगरपरिषद जीवनेश्वर कोंड रस्ता कामाचा शुभारंभ, २.श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीतील पेशवे आळी रस्त्याचे डांबरीकरण कामाचा शुभारंभ, ३.जीवनेश्वर आळीमधील रस्त्याचे उंचीकरण, डांबरीकरण व दोन्ही बाजूची पिचिंग करणे आणि रस्त्याचे कामाचा शुभारंभ, ४.काळेश्री मंदिरापासून धोडगल्ली येथील श्री.रटाटे यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण कामाचा शुभारंभ. दुपारी १२.०० वाजता वडघर-पांगळोली मंदीर जीर्णोध्दार कार्यक्रम व रस्ता उद्घाटन. दुपारी ०१.३० वाजता मौजे संदेरी, सातीम आळी, ता.म्हसळा येथे श्री साईबाबा पालखी सोहळा व साई भंडाऱ्यास उपस्थिती. दुपारी ०२.०० वाजता मौजे संदेरी, ता.म्हसळा येथून मोटारीने इस्लामपूर, जि.सांगली कडे प्रयाण.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# आंबेनळी घाटातील काँक्रीटचे जॅकेटधारी चार ब्रिटीशकालीन पुलांसाठी धोक्याची घंटा

## पोलादपूर-वाई सुरूर मार्गाला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा मिळण्याची गरज

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

गेल्या २३ जुलै २०२२ रोजी पोलादपूर शहराला नळपाणीपुरवठा करणाऱ्या जुन्या जॅकवेलला चोळई व सावित्रीच्या संगमावर जलसमाधी मिळाल्याने आता आंबेनळी घाटातील सर्वच काँक्रीटचे जॅकेट घालण्यात आलेल्या ब्रिटीश कालीन जीर्ण पुलांसाठी धोक्याची घंटा वाजू लागली आहे. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण झाल्याच्या पार्श्वभूमीवर या पोलादपूर वाई सुरूर या मार्गाला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्याची गरज निर्माण झाली आहे. गेल्यावर्षी रायगड जिल्ह्यातील पोलादपूर ते प्रतापगड आणि पुढे सातारा जिल्ह्यातील प्रतापगड ते महाबळेश्वर असा रस्ता अतिवृष्टी आणि भूस्खलनाने बाधित झाल्यामुळे पोलादपूरच्या सार्वजनिक बांधकाम उपविभागाने ठेकेदारांचे उखळ पांढरे करून दिल्यानंतर आता कायमस्वरूपी उपाय करण्याऐवजी आगामी काही पावसाळे उखळ पांढरे करण्याचा धंदा कायम ठेवण्याचा विचार राजकीय इच्छाशक्तीच्या पाठिंब्यावर सार्वजनिक बांधकाम उपविभागाने कायम ठेवला आहे.



आंबेनळी घाटातील चार जीर्ण ब्रिटीशकालीन पुलांना गेल्या २०१६ मध्ये काँक्रीटीचे जॅकीट घालण्याचे काम करून रूंदीकरण करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम उपविभाग पोलादपूरने केले. यानंतर पहिल्याच पावसातच मोरगिरी फौजदारवाडी फाट्याजवळच्या पुलावरील रस्ता खचल्याने कामाचा दर्जा उघड झाला. मात्र, गेल्या वर्षभरात बांधलेल्या मोरीजवळील धबधब्याच्या पाण्यामुळे मोरीजवळचा रस्ता खचून वाहू लागला असून घाटातील एकेरी वाहतूक आता केवळ छोट्या वाहनासाठी सुरू आहे. परिणामी, आंबेनळी घाटातील जॅकीटधारी पुलांवरून तुरळक वाहतूक सुरु असल्यानेच हे पुल अद्याप शाबूत आहेत. या सर्व कामांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याची गरज असून सरकारचा सुमारे ९ कोटीचा निधी या कामावर खर्च झाल्यामुळे लाभार्थीचे काय करायचे, याबाबतही स्वतंत्र चौकशी करून निर्णय घेण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

पोलादपूर-वाई-सुरूर राज्यमार्ग या रस्त्यावरील संरक्षण भिंत व रूंदीकरण, मोऱ्यांचे बांधकाम, मोठ्या मोरीचे बांधकाम, अभियांत्रिकी दुरूस्ती, अभियांत्रिकी सुधारणा, संरक्षण भिंत बांधणे अशी प्रत्येकी २० लाख रूपये खर्चाची सहा कामे करण्याचा डिसेंबर २०१५ मध्ये शुभारंभ आ.गोगावले यांच्याहस्ते करण्यात आला. तत्पूर्वी, पोलादपूर महाबळेश्वर रस्त्यावरील चार ब्रिटीशकालीन पुलांच्या कामांचीही तरतूद करण्यात आली होती. सदर सहा कामांची एकूण अंदाजे खर्चाची मंजूरी १.२० कोटी रूपयांची असल्याची माहिती तत्कालीन डेप्युटी इंजिनियर जाधव यांनी दिली होती. या कामांतर्गत पोलादपूरच्या चोळई आणि सावित्री नदीच्या संगमावरील लेप्रसी हॉस्पिटलजवळील पूलासाठी ६० लाख, मोरगिरी फौजदारवाडी फाट्याजवळील पुलासाठी ३५ लाख, कापडे बुद्रुक भवानवाडीजवळील पुलासाठी २६ लाख आणि आड-पायटे-कापडे खुर्द येथील पुलासाठी ४५ लाख अशा चार ब्रिटीशकालीन पुलांचे काँक्रीटचे जॅकेट करण्यात आले आहे. या सुमारे दीडशेहून अधिक वर्षे जुन्या ब्रिटीशकालीन दगडी पुलांच्या खांबांच्या बांधकामांना अर्ध्या उंचीपर्यंत सिमेंट काँक्रीटची बंदीस्ती करण्यात येऊन या जॅकेटधारी पुलांची रूंदीदेखील वाढविण्यात आली आहे. मात्र, पुलाचे स्लॅब रूंद करताना ते मजबूत आहेत, अथवा कसे याबाबत कोणताही अभिप्राय सार्वजनिक बांधकाम उपविभाग पोलादपूरने दिलेला नाही. या सर्व कामांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याची गरज असून सरकारचा सुमारे ९ कोटीचा निधी या कामावर खर्च झाल्यानंतरही भर पावसाळ्यात केवळ दरडग्रस्त असल्याचे कारण पुढे करून रहदारीमुक्त करीत चारही पुलांच्या जॅकेट बांधकामाला अनोखी सुरक्षा प्रदान करणाऱ्या लाभार्थीचे काय करायचे, याबाबतही स्वतंत्र चौकशी करून निर्णय घेण्याची आवश्यकता व्यक्त होते आहे.

२००५ मध्ये पोलादपूरच्या चोळई आणि सावित्री नदीच्या संगमावरील लेप्रसी हॉस्पिटलजवळील पुलाची दुरूस्ती अतिवृष्टीने पुल वाहून गेल्यामुळे करण्याची आवश्यकता भासली. तत्पूर्वी,मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्गावरील माणगांव व महाड एमआयडीसी येथील ब्रिटीशकालीन पुलाबाबत दहा वर्षांपूर्वी सदर पुलाची मुदत संपुष्टात आल्याचे पत्र इंग्लंडमधून केंद्रीय भुपृष्ठ वाहतुक मंत्रालयाला प्राप्त झाले होते. त्याप्रमाणे पोलादपूर ते महाबळेश्वरदरम्यानच्या ब्रिटीशकालीन 'फिटझेराल्ड' म्हणजेच आताच्या आंबेनळी घाटातील हे पुल अजून कितीकाळ वाहतुकीस योग्य आहेत, याबाबत कोणताही खुलासा अद्याप न आल्याने गेल्या २०१६मध्ये या पुलांच्या खांबांना करण्यात आलेली अर्ध्या उंचीपर्यंतची जॅकेटसदृश्य काँक्रीटची बंदिस्ती आणि त्यावरील स्लॅबचे रुंदीकरण करण्याच्या या बांधकामाने हे पुल अधिकच धोकादायक झाले असण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अशातच, पोलादपूर चोळई व सावित्री नद्यांच्या संगमावरील लेप्रसी मिशन हॉस्पिटलसमोरच्या पुलाजवळील पोलादपूर शहराला पाणीपुरवठा करणारी जुनी जॅकवेल गेल्यावर्षी २२ व २३ जुलैच्या रात्री दोन्ही नद्यांच्या पुरासोबत वाहून गेल्यानंतर तसेच पोलादपूर ते प्रतापगड आणि पुढे महाबळेश्वरपर्यंतचा आंबेनळी घाट ठिकठिकाणी दरडग्रस्त झाल्यानंतर पोलादपूर ते प्रतापगडदरम्यान सिमेंट काँक्रीटचे जॅकेट घालून आजमितीस उभे असलेल्या जीर्ण ब्रिटीशकालीन पुलांना महाड एमआयडीसीजवळच्या सावित्री नदीवरील पुलाप्रमाणे अचानक जलसमाधी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पोलादपूर वाई सुरूर राज्यमार्गावरील गेल्या १२ वर्षांत झालेल्या सर्व कामांची दर्जा व गुणवत्ता नियंत्रण विभागाच्या अभियंत्यांकडून निष्पक्षपणे चौकशी करण्याची गरज असून या आंबेनळी घाटातील वाई सुरूर रस्त्याला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा मिळाल्यास नव्याने मजबुतीसह बांधकाम होऊन हा घाट सक्षमपणे वाहतुकीस कायम निर्धोक होऊ शकणार आहे.

# महाराष्ट्र पोलीस मित्र व नागरिक समन्वयची पनवेल शहर कमिटीची कार्यकारिणी जाहीर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र पोलीस मित्र व नागरिक समन्वय समिति, महाराष्ट्र राज्यच्या, पनवेल शहर कमिटीच्या पदाधिकारी सदस्यांच्या नेमणूका संघटनेचे अध्यक्ष दिलीप सवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आज करण्यात आल्या.



यात पनवेल शहर महिला अध्यक्ष पदी सौ श्वेता म्हात्रे, उपाध्यक्ष पदी गीता रावल तर शहर उपाध्यक्ष पदी प्रसाद म्हात्रे, करंजाडे विभाग अध्यक्ष पदी लक्ष्मीकांत कावडकर, प्रशांत मानकामे, सपना पाटील, एकता रावल, निलेश पाटील, आरती रावल, आदेश पाटील, प्रविशाल म्हात्रे आदींना संघटनेचे कोकण विभाग अध्यक्ष प्रसाद हनुमंते यांच्या उपस्थितीत जाणीव एक सामाजिक संघटनेचे संस्थापक, कार्याध्यक्ष तथा नगरसेवक नितीन जयराम पाटील तसेच संघटनेचे शहर अध्यक्ष पत्रकार संजय कदम यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र पोलीस मित्र व नागरिक समन्वय समिती मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पनवेल सह कोकण आणि संपूर्ण महाराष्ट्रातील अग्रगण्य आणि महत्वाची संघटना म्हणून प्रख्यात असून. राज्यातील च नव्हे तर राज्य बाहेरलही अनेक नागरिक या संघटनेत सामील होत आहेत.

दिवसे गणिक ही संघटना कात टाकत आहे. महाराष्ट्र पोलीस आणि नागरिक यांच्यात सर्वाधिक समन्वय साधून योग्य दिशेने वाटचाल या संघटनेची चालू आहे. ही बिगर राजकीय संघटना असल्याने सर्व स्तरातून फार मोठा प्रतिसाद मिळत आहे. काही राजकीय पक्षाचे कार्यकर्ते संघटनेत असलेतरी संघटनेसाठीही काम करत आहेत. संघटनेचे पदाधिकारी आणि प्रत्येक सदस्य हे संघटनेचा आत्मा असल्याचे संघटनेचे कोकण विभाग अध्यक्ष प्रसाद हनुमंते यांनी सांगितले. तर नितीन जयराम पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, पोलीस मित्र हे शासन म्हणजे पोलीस यंत्रणा आणि नागरिक यांच्यामधील दुवा असून याच्यात येणाऱ्या अडचणी व गैरसमज दूर करण्याची मोठी जबाबदारी संघटनेच्या प्रत्येक सदस्यची असून ती पूर्णतः पार पाडतील अशी अपेक्षा व्यक्त केली.

# अनाथ गाई, पशु पक्षांसाठी द्रोणागिरी सामाजिक कला क्रीडा शैक्षणिक सांस्कृतिक संस्था बोकडविराचे स्तुत्य उपक्रम

## जनावरांच्या संरक्षणासाठी घेतला पुढाकार



**दै.रायगड नगरी । उरण**

द्रोणागिरी सामाजिक कला क्रिडा शैक्षणिक सांस्कृतिक संस्था बोकडविरा रजि नंबर २९१ उरण रायगड यांच्या तर्फे सकाळी रस्त्यावरील अनाथ गाई व पशु पक्षी यांना पाणी पिण्यासाठी व चारा, दाणे ठेवण्यासाठी बोकडविरा ते सिडको ट्रेनिंग सेन्टर या परीसरात भांडी ठेवण्यात आली.

अतिशय कडक उन्हाळा सुरू आहे. अशा वेळेस अनाथ गाई, पशु पक्षी यांचा पाण्या अभावी तडफडुन मुत्यु होऊ नये. पाणी, चारा, दाण्यांची गैरसोय होऊ नये. या उदेशाने निस्वार्थ सेवेसाठी द्रोणागिरी सामाजिक कला क्रिडा शैक्षणिक सांस्कृतिक संस्थेने हा स्तुत्य व माणुसकीच्या दृष्टीने उत्तम उपक्रम राबविला आहे.

या कार्यक्रमासाठी उपस्थित समाज सेवक विकास पाटील, घनश्याम पाटील, शिवकुमार पाटील, नरेंद्र पाटील, गंगाराम पाटील, शिवाजी ठाकूर, जितेंद्र पाटील , दिप्ती पाटील, मंजुळा पाटील, मयुरी तांडेल, प्राजक्ता तांडेल, पुष्पलता पाटील, यशवंत ठाकूर आदी उपस्थित होते.या सर्वांनी जनावरांना, पशु पक्षांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी विशेष मेहनत घेतली आहे.

कुपया चारा, चपाती, पक्षासाठी दाणे, पाणी टाकताणा त्या परीसरात ठेवण्यात आलेल्या भांड्यामध्ये टाकण्याची कृपया करावी. जेणे करून अन्न मातीत पडुन खराब व सुकनार नाही. जनावरांना खाण्याजोगी राहील. असे आवाहन द्रोणागिरी सामाजिक कला क्रीडा शैक्षणिक सांस्कृतिक संस्था बोकडविरा तर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

# नागरिकांची मते जाणून घेण्यासाठी समर्पित आयोगाचा दौरा जाहीर

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागास प्रवर्गातील आरक्षणासाठी जनतेची मते जाणून घेण्यासाठी आणि या क्षेत्रात काम करणाऱ्या विविध सामाजिक संघटना यांची निवेदने स्वीकारण्यासाठी या समर्पित आयोगाने विभागवार कार्यक्रम जाहीर केला असून कोकण विभागात बुधवार दि. २५ मे २०२२ रोजी दुपारी २.३० ते दुपारी ४.३० वाजता समर्पित आयोग हे विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई येथे भेट देतील.

महाराष्ट्रातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायती आणि शहरातील महानगरपालिका, नगरपालिका आणि नगर पंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांच्या मागास प्रवर्गास (इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती) आरक्षण देण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे महाराष्ट्र शासनाने समर्पित आयोग गठीत केला आहे. समर्पित आयोग हा शनिवार दि. २१ मे २०२२ रोजी सकाळी ९.३० ते सकाळी ११.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालय पुणे येथे भेट देतील. रविवार दि. २२ मे २०२२ रोजी सकाळी ९.३० ते सकाळी ११.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद तर याच दिवशी सायंकाळी ५.३० ते सायंकाळी ७.३० पर्यंत विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक येथे भेट देतील. शनिवार दि. २८ मे २०२२ रोजी सकाळी ९.३० ते सकाळी ११.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती तर याच दिवशी सायंकाळी ४.३० ते सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर येथे भेट देतील.

या समर्पित आयोगाच्या भेटीच्या वेळी नागरिकांना आपली मते वेळेत मांडता यावीत आणि निवेदन देता यावेत, यासाठी संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयात आपल्या नावाची नोंदणी भेटीच्या दिनांकापूर्वी करावी. तसेच यासाठी संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयाशी संपर्क करावा, असे आवाहन या समर्पित आयोगाचे सदस्य सचिव पंकज कुमार (भा.प्र.से.) यांनी केले आहे.

# मुरूड तालुक्यात पाच ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणूका कार्यक्रम जाहीर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार राज्यातील ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणूका जाहीर झाल्या असून रायगड जिल्ह्यात १२३ ग्रामपंचायतीच्या १७२ जागांसाठी निवडणूक होत असून यात मुरुड तालुक्यातील वावडुंगी, सावली,राजपूरी,एकदरा व चोरढे पाच ग्रामपंचायतीत रिक्त झालेल्या पदांसाठी दि.५जून २०२२ रोजी मतदान होणार असल्याचे व पोटनिवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असल्याची माहिती निवडणूक नायब तहसीलदार अमित पूरी यांनी दिली.

मुरूड तालुक्यातील वावडुंगी-१, सावली-१,राजपूरी-४,एकदरा-८ व चोरढे-१ या पाच ग्रामपंचायतीत रिक्त झालेल्या एकूण १५ पदांसाठी पोटनिवडणूक होत आहे.या पोटनिवडणुकीसाठी तहसीलदार यांनी निवडणूकीची नोटीस प्रसिद्ध करण्याचा गुरुवार दि.०५-०५-२०२२ आहे. नामनिर्देशनपत्रे (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) मागविण्याचा व सादर करण्याचा शुक्रवार दि.१३ मे ते शुक्रवार दि.२० मे २०२२ रोजी सकाळी ११.०० वा.ते दु.३.००वा.(शनिवार,रविवार व सार्व.सुटी वगळून), नामनिर्देशन पत्र छाननी सोमवार दि.२३-०५-२०२२ रोजी सकाळी ११.०० वा.पासून छाननी संपेपर्यंत, नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचा दिनांक २५-०५-२०२२(बुधवार) दुपारी ३.०० वा.पर्यंत, निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दि.२५-०५-२०२२(बुधवार) असून दुपारी ३.०० वा.नंतर अंतिमरित्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.आवश्यक असल्यास रविवार दि.०५-०६-२०२२ रोजी सकाळी ७.३०वा. पासून ते सायंकाळी ५.३० वा.मतदान घेण्यात येणार असून सोमवार दि.०६-०६-२०२२ रोजी मतमोजणी व निकाल जाहीर करण्यात येतील. अशी माहिती निवडणूक नायब तहसिलदार अमित पूरी यांनी दिली आहे.

# धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे या चित्रपटाचा खारघर येथील लिटिल वर्ल्ड मॉल येथे शुभारंभ



**दै.रायगड नगरी । पनवेल**

धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे हा मराठी सिनेमा आज प्रदर्शित झाला असून या सिनेमाचा खास शो आज सकाळी खारघर येथील लिटिल वर्ल्ड मॉल येथील कार्निव्हल मल्टिप्लेक्स मध्ये पार पडला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांनी वंदनीय गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या कटआउट समोर पूजा केली.

हा सिनेमा आजच्या तरुणाईला धर्मवीर आनंद दिघे साहेबांची खरी ओळख करून देणार असून जास्तीत जास्त लोकांनी तो पहावा असे आवाहन जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी यावेळी केले. याप्रसंगी शिवसेनेचे पदाधिकारी व खारघर शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## पनवेल महानगरपालिका

**शहर अभियंता विभाग**

**जाहीर ई-निविदा सूचना**

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/२२/प्र.क्र. /१३१४/२०२२ दिनांक : १३/०५/२०२२

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय / निमशासकीय (Centeral Government / State Government / Government under taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार जाहीर ई-निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/18/2022-23 | पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती-ड, प्रभाग क्र.१९ मधील अं.भू.क्र.१९३ मध्ये रोज बाजार विकसित करणे | ६,६५,३४,३६६/- |

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेत स्थळावर दि.१९/०५/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(तृप्ती सांडभोर)
अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपालिका